प्रकरण पाचवे : महानदीच्या तीरावर व झेलझपाट
या दोन कादंबऱ्यातील भाषा व निवेदन पद्धती

।। महानदीच्या तीरावर व झेलझपाट या दोन कादंब-यातील भाषा व निवेदनपध्दती ।।

भाषा हे कोणत्याही वाङ्मयीन कलाकृतीचे माध्यम असते. कलाकृतीत आशयाला जसे महत्व असते तसे तो आशय ज्या भाषेद्वारे प्रकट झालेला असतो ती भाषाही महत्वाची असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये **महानदीच्या तीरावर** आणि **झेलझपाट** या कादंब-यांच्या भाषेचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे हे पाहावयाचे आहे. त्याबरोबरच कादंबरीमध्ये वेळोवेळी निवदने आलेली असतात. या निवेदनांमधून लेखकाची निवेदनपध्दती व त्या विषयाकडे पाहाण्याचा त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन त्या निवेदनातून व्यक्त झालेला असतो. म्हणून वरील दोन्ही कादंब-यांतील निवेदनाची भाषा कशाप्रकारची आहे या गोष्टीचा विचार प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

कादंब-यातील भाषेचे स्वरूप पाहाण्यापूर्वी कादंबरीतील भाषेसंबंधी तात्त्विक विवेचन पाहू. त्यामुळे भाषेचे स्वरूप पाहाण्याविषयी कल्पना येईल. लेखक मनातील आशय व्यक्त करण्यासाठी विशिष्ट भाषेचा, माध्यमाचा वापर करीत असतो. ती लेखकाची शैली असते. इंग्रजीत शैली या शब्दाला Style असा शब्द आहे. शैली म्हणजे पध्दत, ढब. ' अमक्या माणसाची बोलण्याची पध्दत विचित्र आहे. ' ' त्याचे चालणे बेढब आहे. ' ' ही काय काम करण्याची पध्दत आहे ? ' असे कितीतरी वाक्यप्रयोग दैनंदिन व्यवहारात आपण वापरतो. वाङ्मयीन कलाकृतीत लेखक उपमा, उत्प्रेक्षादी अलंकारांचा वापर करतो. म्हणजेच त्याची ती शैली असते. शैली हा वाङ्मयकृतीचा बाह्यांग विचार होय. बा.सी. मर्ढेकर म्हणतात - ' प्रत्येक लिखाणात काही तरी आशय व्यक्त केलेला असतो. हे जे व्यक्त करणे, ही जी अभिव्यक्ती, हे जे निवेदन त्याच्या पध्दतीची अंगे-उपांगे म्हणजे शैली. अशा ह्या शैलीच्या गुणधर्मांना ते केवळ शैलीचे गुणधर्म एवढीच किंमत. लिखाण किंवा वाङ्मयकृती सुंदर आहे की नाही हे ठरविण्यास त्याचा फारसा उपयोग होणे अशक्य.' [1] मर्ढकरांचे हे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, कोणत्याही वाङ्मयकृतीमध्ये लेखक आशय प्रकट करतो. हा आशय व तो व्यक्त करण्यास वापरलेली निवेदनपध्दती, भाषा किंवा शब्द, अलंकार इत्यादी अंगे-उपांगे म्हणजे शैली. शैलीच्या गुणधर्मा आधारे त्या लिखाणास ललितकृती अशी संज्ञा देणे कठीण जाते. भालचंद्र खांडेकर व लीला गोविलकर स्टाईल संबंधी लिहितात - ' एकाच आशयाचा वेगवेगळया साहित्यिकांकडून होणारा आविष्कार त्या त्या साहित्यिकाचे व्यक्तिमत्वच व्यक्त करीत असतो. आणि अशा रीतीने आशय, व्यक्तिमत्व व आविष्कार

यांचा सुदंर मिलाफ घडतो तेव्हां तिला स्टाईल म्हणायचे ।'[2] खांडेकर व गोविलकर यांचे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, एकच आशय अनेक साहित्यिकांकडून वेगवेगळया त-हेने आविष्कृत होतो. त्यातून त्या लेखकाचे व्यक्तिमत्व प्रकट होते. आशय, लेखकाची लेखनशैली व आविष्कारपध्दती यांच्या सुयोग्य एकत्रिकरणाला स्टाईल म्हणावयाचे. शैलीची भालचंद्र नेमाडे यांनी केलेली व्याख्या लक्षात घेणे अगत्याचे होय. ' एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरेता वापरल्या जाणा-या तंत्रसमुच्चयाची पध्दती म्हणजे **शैली**.'[3] नेमाडे यांचे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक मनातील आशय प्रभावी व परिणामकारकरित्या प्रकट करण्यास विशिष्ट भाषिक माध्यमाचा अवलंब करतो. विचारांचा, आशयाचा वाचकाच्या मनवर ठसा उमटावा, त्याला समजावे यासाठी शब्दांना विशिष्ट शैलीने मांडतो. म्हणजेच भाषेची लेखकने केलेली व्यवस्था. लेखनशैलीविषयी बा. सी. मर्ढेकर म्हणतात - ' शब्दांची निवडक योजना, निरनिराळया अलंकारांचा उपयोग इत्यादी शैलीत अंतर्भूत होणा-या गोष्टी ह्या साधनात्मक असतात. लेखकाला जो आशय व्यक्त करायचा असतो तो व्यक्त करण्याकरिता ह्या गोष्टींचा साधन म्हणून उपयोग केला जातो. अशा त-हेच्या शैलीचे मुख्य कार्य एकच असते, ते हे की आशयाच्या किंवा अनुभवाच्या अभिव्यक्तीत इंद्रियगोचर अशी विवक्षितता यावी. सामान्यतः अनुभव हा ढोबळ, अस्पष्ट असा असतो. संज्ञाप्रवाहातील त्याच्या कडा, त्याचा आकार, त्याचे स्वरूप हे रेखीव नसते. त्या अमूर्त, गुंतागुंतीच्या आणि ब-याच वेळा बुध्दिगम्य अशा अनुभवाला काटेकोर सुस्पष्ट, जिवंत हाडा-मांसाचे स्वरूप देणे हे शैलीचे ध्येय असते.'[4] मर्ढेकरांचे हे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक मनातील विचार, आशय अभिव्यक्त करताना अलंकार, निवडक शब्द इत्यादी साधनांचा उपयोग करून आशयात जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न करतो. तसेच इंद्रियगोचर संवेदनांच्या साहाय्याने आशयाला पक्केपणा, स्पष्टपणा आणतो.

लेखक आपला विचार, आशय विशिष्ट लेखनशैलीने व्यक्त करीत असतो. एकाच आशयाचा वेगवेगळया साहित्यिकांकडून होणारा आविष्कार वेगळा असतो. त्या साहित्यिकाचे व्यक्तित्व त्यातून व्यक्त होत असते प्रत्येकाची लेखनशैली वेगळी असते. कोल्हटकरांची भाषा रसाळ व प्रसादयुक्त असली तरी तिला अलंकारांची फाजिल प्रीती नाही, तर गडक-यांची भाषा विनोद करू लागली की, खट्याळपणे दात विचकून हसते. शैली, तंत्र यांचा आशयाशी औचित्याचा, सहकार्याचा व साधर्म्याचा संबंध असतो.

लेखकाच्या लेखनशैलीवरून त्या लेखकाच्या स्वभावाबद्दलही जाणीव होते. लेखकाची

आनंदीवृत्ती, सचोटी, धर्मनरायणता, सौंदर्यासक्ती, भाविकता, कारूण्य हे स्वभावविशेष भाषेत उतरतात. भाषाशैलीवरून लेखकाच्या सौंदर्यासक्तीची कल्पना येते. ज्या ज्या गोष्टी लेखकाचे मन आकर्षून घेतात त्यतून त्याची कलादृष्टी दिसते. त्या गोष्टी नकळत त्याच्या भाषाशैलीत उतरतात. लेखकाच्या मनाचे संपूर्ण दर्शन, त्याची कल्पकता, सौंदर्यदृष्टी इत्यादी वैशिष्टयपूर्ण बाबींचे दर्शन त्याच्या भाषाशैलीत घडते. लेखकाच्या आवडी-निवडी या ना त्या स्वरूपात त्याच्या भाषाशैलीत उतरताना दिसतात. लेखक ज्या वातावरणात वाढला असेल त्या वातावरणाचा ज्या त-हेचे शिक्षण त्याने घेतले असेल त्या शिक्षणाचा त्याच्या लेखनशैलीवर ठसा पडलेला दिसतो. लेखनशैलीतून त्याचा लेखनविषयक हेतूही स्पष्ट होतो. यावरून भाषाशैली व लेखकाचे व्यक्तिमत्व यांचे जिव्हाळयाचे नाते असते. कादंबरीमध्ये एकापेक्षा अधिक भावनांची लयबध्द अशी आकृती अथवा रचना केलेली असते. बा. सी. मर्ढेकर म्हणतात - ' कादंबरीत किंवा नाटकात किंवा महाकाव्यात ह्या आकृतीचे आकारतत्व, घटनातत्व म्हणजे संभवनीयतेचे तर्कशास्त्रीय तत्व नसते, त्याप्रमाणे ते सहचारी कल्पनांचे मानसशास्त्रीय तत्वही नसते. त्याचे स्वरूप सौंदर्यशास्त्रीय लयतत्वाचे असते. केंद्रीभूत अशी मध्यवर्ती मुख्य भावना, तिच्या आश्रयाने तिला कधी छेदीत तर कधी समांतर जाणा-या पण सदैव पुरस्कारक अशा दुय्यम भावना - अशा भावनांच्या लयाने ही कलाकृती सिध्द होते. लयाचे हे तत्व आणि त्याचा संवाद, विरोध व समतोलपणा ह्या नियमान्वये आविष्कार ह्यांत वाङमयकृतीच्या लालित्याचे, कलास्वरूपाचे खरे मर्म आहे. ' [5] मर्ढेकरांचे हे विवेचन लक्षात घेता असे म्हणता येईल की, कोणत्याही लिखाणचे लालित्य त्या लिखाणाच्या घाटावर अवलंबून असते. हा घाट, ही सुसंघटना, Form फक्त व्यक्त अशा आशयात, भावनानुभूतीतच शोधता येतो. हा घाट भावनानुभूतीतील घटकांच्या लयबद्ध रचनेत आढळतो. लयत्त्व हे घाटाचे, सुसंघटनेचे, Form चे चैतन्यतत्व होय. मर्ढेकरांचे मते शब्दांचे भावनिक अर्थ हे साहित्याचे माध्यम आहे. मर्ढेकरांचे हे लयतत्व एखाद्या कादंबरीतील संवाद, तसेच पात्राच्या मानसिक आंदोलनातील लयसंबंध यात पाहाता येते. कलाकृतीचे सौंदर्य तपासता येते. कलाकृतीतील पात्रे, त्यांचा स्वभाव, रस, वातावरणनिर्मिती यांचा लयसंबंधाच्या संदर्भात विचार करता येतो. लेखकाच्य मनात स्फुरणारे कुतूहल, सभोवतालच्या जीवनाबद्दल वाटणारी उत्सुकता, भावनांचे विविध रंग इत्यादी गोष्टी लेखकाच्या लेखनशैलीतून प्रकट होतात.

प्रत्येक लेखकाच्या लेखनशैलीत भिन्नता दिसते. काही लेखकांची वाक्यरचनेची एक विशिष्ट पध्दत असते. कधी लेखकांना लांबचलांब वाक्यरचना आवडते. काही लेखक प्रतिमांचा वापर करतात, पदरचनांमध्ये लयतत्वाचा वापर करतात. अशा या शैलीचे गुणधर्म, वैशिष्टये भालचंद्र नेमाडे

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

यांनी सांगितली आहेत ती अशी - ' ध्वनीचे स्वभाव (मधुर, कर्कश), विविध शब्दांच्या योजनेने निर्माण झालेले ध्वनी व त्यांचे परस्परसंबंध (साम्य,विरोध), शब्दांच्या ध्वनिसामर्थ्याचे विशिष्ट अर्थच्छटा खुलविण्याचे सामर्थ्य, शब्दाशब्दांतील वाच्यार्थ, सूचितार्थ, संहितार्थ, समांतरत्व, परस्परसंबंध, विविध जातींचे शब्द एकत्र आणण्यामागचे हेतू, विविध प्रकारचे शब्द (जुने, संपूर्णतः नवे, बोलीभाषेतील, विशिष्ट व्यवसायातील क्षेत्रनिर्देशक, इत्यादी) वापरण्याचे हेतू, शब्दरचना, पुनरावृत्ती, प्रतिमा, शब्दसमुच्चय, वाक्यांश, नाद, व्याकरणविशेष, संहितेची मांडणी, संहिता छापण्याची (= वाचण्याची) पध्दती, निवेदनपध्दती अशा अनेकविध संबंधांची ' भावणारी संगती ' (रा. भा. पाटणकर यांच्या शब्दांत) शैलीचे अस्तित्व जाणवून देते. '[6] भालचंद्र नेमाडे यांचे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक आपली लेखनशैली प्रभावी व परिणामकारक होण्यास, आपला आशय स्पष्ट करण्यास अनेक क्लृप्त्या वापरतो. उदा. साम्य, विरोध, बोलीभाषा, प्रतिमा, इत्यादी ही सर्व वैशिष्ट्ये एकाच लेखनात आढळत नाहीत. आपल्या आशयानुरूप, अर्थाचे पातळीवर लेखक काही वैशिष्टयांचा वापर करतो. या वैशिष्टयांवरून त्याच्या लेखनशैलीची आपणास माहिती मिळते. वेधक शैलीच्या जोरावर लेखक लेखनात, आशयात अपूर्वाई आणू शकतो.

लेखनशैलीचे विविध प्रकार आढळतात. डॉ. वा.के.लेले यांनी निवडक शैली प्रकार सांगितले आहेत ते असे - औपचारिक शैली, विधानात्मक शैली, निदर्शनात्मक शैली, युगीय शैली, क्रियापदप्रधान व नामप्रदान शैली, सारांशात्मक निवेदन शैली, मिश्रणात्मक शैली.[7]. डॉ. लेले यांच्याप्रमाणेच शैलीचा अभ्यास करण्यास भालचंद्र नेमाडे यांनी चार प्रकार सांगितले आहेत ते असे - साहित्यकृतीची शैली, वैयक्तिक शैली, युगशैली व साहित्यप्रकाराची शैली.[8] नेमाडे यांनी सांगितलेल्या या प्रकारांचा थोडक्यांत परामर्श घेवू.

साहित्यकृतीच्या शैलीत लेखनातील भाषिक रूपांचा अभ्यास की ज्याद्वारे त्या साहित्यकृतीतील आशय, पात्रे, जीवनदृष्टी, रूप यांना योग्य अशी भाषिक रूपे संघटीत केलेली असतात.

वैयक्तिक शैली - दुस-या कोणत्याही लेखकाच्या शैलीपेक्षा प्रत्येकाची खास भाषिक लकब वापरण्याची पध्दत असते. त्यामुळे त्याचे वेगवेगळेपण लक्षात येते. वैयक्तिक शैलीतून लेखकाचं स्वतःचे भाषिक वर्तन सनजते. लेखकाच्या या वर्तनामुळे नवीन भाषिक रूपे रूढ होतात. केशवसुत, रेगे, मर्ढेकर इत्यादींनी अशी अनेक रूपे रूढ केली आहेत.

युगशैली - साहित्यामध्ये सतत स्थित्यंतरे बदल झालेले दिसतात. यादवकाल, शिवकाल, पेशवेकाल यानुसार साहित्यामध्ये वेगवेगळे कालखंड दिसतात. राजकारणाप्रमाणेच सामाजिक सांस्कृतिक

स्थित्यंतरे त्या त्या युगात झालेली दिसतात. या सर्व बदलांचे दर्शन त्या त्या युगातल्या साहित्यामध्ये स्पष्टपणे जाणवते. त्या कालखंडातील शैलीय रूपे साहित्यामध्ये सापडतात. त्या त्या युगातील सर्व लेखकांच्या शैलीसमुच्चयाला सामावणारी यादृष्टीने युगशैलीकडे पाहिले जाते. ही शैली आधीच्या व नंतरच्या युगशैलीना जोडते. त्या कालखंडातील शैलीची छाप साहित्यकृतींवर पडलेली दिसते. ही शैली त्या कालखंडातील नैतिक, सामाजिक, धार्मिक जीवनाची मूल्ये इत्यादींशी सेंद्रियपणे जोडलेली असते.

साहित्यप्रकाराची शैली - कादंबरीची भाषा, कवितेची भाषा, नाटकाची भाषा अशी त्या त्या साहित्यप्रकाराची वेगवेगळी भाषा दिसते. वाचकाच्या मनात आशयानुरूप, साहित्यप्रकारानुरूप भाषा वापरली जाते. कादंबरीमध्ये कथानक, पात्रे, भाषिक व्यवस्था इत्यादी घटकांना सामावून घेणारे भाषिक सामर्थ्य असते.

वरील विवेचनातून लेखक लेखनामध्ये विविध शैली प्रकारांचा वापर करून आपले विचार, आपले आशयद्रव्य वाचकांना समजेल, रुचेल या पध्दतीने वापरतो. आपला आशय प्रभावी व परिणामकारकपणे मांडण्याचा प्रयत्न करतो. लेखक आशयानुरूप शैलीचा वापर करतो.

लेखक भाषा माध्यमातून आपल्या सभोवतालचे सामाजिक वास्तव चित्रीत करतो. भालचंद्र नेमाडे म्हणतात - ' शैलीचा प्रमुख धर्म म्हणजे निवड, कादंबरीकार वास्तवातील कोणत्या घटनापात्रादी तपशिलाची निवड त्याच्या आशयसूत्रानुरूप करतो, त्यातून त्याचा मूल्यविवेक दिसतो. अशा अनेक तपशिलांमधून कादंबरीकाराची नैतिकता सिध्द होते. ही नैतिकता चुकीची असली तरी असावीच लागते, नाहीतर कादंबरीतील तपशील आशयसूत्रात गुंफले जात नाहीत. मला काय आवडते व काय नाही एवढीतरी किमान भूमिका कादंबरीकाराला घ्यावीच लागते. नैतिकता नसलेले कादंबरीकार वास्तवाला सामोरेसुध्दा जाऊ शकत नाहीत. कादंबरीकाराचे पूर्वग्रह असतात, परंतु ते पात्रावर व घटनांवर लादले तर वास्तवता विद्रूप होते. वास्तववादी कादंबरीकार पात्रांवर संपूर्ण ताबा कधीच गाजवत नाही. जिथे त्याची नैतिकता पात्रांच्या दृष्टिकोनाशी खटकते तिथे ह्या संघर्षातून, उदात्तीकरण, विडंबन, विरोध, किंवा स्वीकृती अशा वास्तवाची नोंद घेणा-या वृत्ती दिसून येतात. '[9]
नेमाडे यांचे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक आपल्या आशयद्रव्याला अनुरूप अशा वास्तवातील कोणती पात्रे, घटना, तपशील यांची निवड करतो त्यावरून त्याच्या लिखाणातील नैतिकता, जीवनविषयक दृष्टिकोन दिसतो. लेखकाने लिहिताना आपल्याला काय आवडते व काय नाही याबद्दल ठाम भूमिका घेतली पाहिजे. लेखकाने स्वतःचे पूर्वग्रह त्या पात्रांवर, घटनांवर लादल्यास लेखक

साहित्यकृतीमध्ये वास्तव योग्य प्रकारे चित्रीत करू शकणार नाही. आपली मते न लादता लिखाण केल्याने लेखनशैलीत विरोध, उदात्तीकरण अशा वास्तवाचे दर्शन घडविणा-या वृत्ती दिसतात.

थोडक्यात - लेखक आपले विचार, आशय भाषा या माध्यमातून व्यक्त करीत असतात. साहित्यकृतीत आशयाला जसे महत्व असते तसेच तो आशय ज्या भाषेद्वारे, ज्या शैलीने, रीतीने, स्टाईलने लेखकाने प्रकट केलेला असतो त्या लेखनशैलीलाही महत्व असते. लेखनशैलीतून लेखकाचे व्यक्तित्व, स्वभाव, सौंदर्यासक्ती, अभिरुची, भोवतालच्या जीवनाबद्दल वाटणारी उत्सुकता, भावनांचे रंग, मनात स्फुरणारे कुतूहल, जीवनसृष्टी इत्यादीचे दर्शन घडते. लेखक वातावरणाशी निगडीत अशी भाषा वापरतो.

आतापर्यंत आपण कादंबरीची भाषा (शैली) याविषयी विचार केला. एकच आशय वेगवेगळया रीतींनी सांगता येतो यावेळी लेखकाने तो आशय कसा सांगितला आहे याचा विचार करतो. म्हणजेच लेखकाने तो आशय कोणत्या पध्दतीने अभिव्यक्त केला आहे, निवेदन केला आहे याचा आपण विचार करतो. बा. सी. मर्ढेकर म्हणतात - ' लेखकाच्या समग्र अभिव्यक्तिपध्दतीत, निवेदनपध्दतीत आणखी काही घटक असतात, तिची आणखी काही कमीअधिक महत्वाची अंगे आहेत...... काही लेखक आपला आशय व्यक्त करताना शब्द आणि हावभाव ह्या दोहोंचे साहाय्य लक्षात घेऊन लिहितात, इतर काही लेखक फक्त शब्दांवरच भिस्त ठेवतात. पहिल्या गटाच्या कृती म्हणजे नाटके, दुस-या गटाच्या कृती म्हणजे कादंबरी, काव्य किंवा इतर प्रकारचे वाङ्मय. अभिव्यक्तिच्या किंवा निवेदनाच्या पध्दतीची ही आणि अशीच इतर सर्व अंगे मिळून लेखकाची संपूर्ण अभिव्यक्ती - किंवा निवेदनपध्दती - सिध्द होते. '[10] मर्ढेकरांचे हे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक भाषा, अलंकार, गद्यमय रचना इत्यादी अनेक साधनांचा वापर करतो व आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे ते प्रकट करीत असतो. या साधनांचा त्याने कितपत कसा उपयोग केला आहे यावरून त्याच्या निवेदनपध्दतीची जाणीव आपणास होते. आशय व अभिव्यक्ती यांचा परस्पर निकटचा संबंध असणे आवश्यक असते. यातून त्याचे लालित्य लक्षात येते. यांच्या घनिष्ट संबंधामुळे लेखकाच्या लिखाणात सौंदर्य अवतरते. स.ग.मालशे म्हणतात - अमुक एका अलंकाराचे अमुक एक अभिव्यक्तिमूल्य असे एकास एक प्रमाण दर्शविणारा अणुवादी दृष्टिकोण सोडून देणे भाग असले,तरी शैलीगत लकबी व त्यांचे परिणाम यांमध्ये विशिष्ट नाते प्रस्थापित करणे अशक्य नाही.उदात्त, हास्योत्पादक, डौलदार वा सरधोपट अशा प्रकारच्या अर्थवत्तेचा रोख असणा-या परिच्छेदात अमुक एक प्रकारचे अलंकार पुनरावृत्त होतात व त्यांची अन्य प्रकारच्या विशिष्ट अलंकारांशी सांगड घातली जाते, हे दाखवून देणे, हा एक मार्ग झाला. ' मालशे यांचे हे विवेचन

ध्यानात घेता असे म्हणता येईल की, एखाद्या तांत्रिक युक्तीची अलंकाराची पुनरावृत्ती झाली तर त्यात अर्थशून्यता येत नाही. अन्य अलंकाराशी लेखक निवेदनाद्वारे योग्य पध्दतीने सांगड घालीत असतो.

लेखक निवेदन पात्रासंबंधी, वातावरणासंबंधी काही सांगतो. यातून जीवनाकडे पाहाण्याची लेखकाची दृष्टी कळते. लेखक हे निवेदन कधी अप्रत्यक्षपणे तर कधी सूचकपणे करतो. सूचक पध्दतीने लेखकाची दृष्टी प्रकट होते. लेखक निवेदनातून जीवनाविषयी भाष्यही करताना दिसतात. कलाकृतीत जसे लालित्य हवे तसेच कलाकृतीतला आशय खरा आहे हे पटवून देण्यासाठी लेखक विशिष्ट पध्दतीचा अवलंब करतात. रा.भा.पाटणकर म्हणतात - ' कलाकृतीतला आशय खरा व स्वच्छा आहे असे वाचकाला पटले पाहिजे म्हणून लेखक विशिष्ट निवेदनपध्दतीचा अवलंब करतो. सामान्यपणे कांदबरीकाराचा दृष्टिकोण सर्वसाक्षी निर्मात्याचा असतो. पात्रे व घटना त्यानेच निर्माण केलेल्या असल्यामुळे त्याला त्यांच्याविषयी सर्व काही माहीत असते. परंतु प्रत्यक्ष आयुष्यात कोणत्याही गोष्टीचा आपल्याला जो परिचय होतो तो असा सर्वसाक्षी दृष्टिकोणातून होत नाही. आपल्या दृष्टीला मर्यादा असतात. गोष्टींचे स्वरूप आपल्याला हळूहळू समजते आणि पुष्कळदा ते पूर्णपणे समजतही नाही. परंतु या अपु-या जाणिवेत जी खोली व जो सच्चेपणा असतो तो सर्वसाक्षी दृष्टिकोणातून मिळालेल्या वस्तुस्थितीच्या जाणिवेत पुष्कळदा नसतो. म्हणून काही वेळा कादंबरीकार मर्यादित दृष्टिकोणातून निवेदन करतो. काहीं कादंब-या विशिष्ट पात्रांच्या दृष्टिकोणांमधून लिहिलेल्या असतात, काहीत पत्रे, रोजनिशी, संवाद यांचा भरपूर उपयोग केलेला असतो. ' [12] पाटणकरांचे हे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, लेखक आपला आशय खरा आहे हे सांगण्यासाठी पात्रे, संवाद याद्वारे विशिष्ट प्रकारे निवेदनपध्दतीचा वापर करतात. म्हणजेच आशय व अनुरूप अशी निवेदनपध्दती निवडून लेखक जीवनाविषयी, परिस्थितीवर एक प्रकारचे भाष्य करतो. त्यातून त्याची नैतिकता, खरेपणा व्यक्त होतो.

अशा या अभिव्यक्तीचे महत्व पटवून देताना भालचंद्र खांडेकर व लीला गोविलकर म्हणतात - ' आशयाला आणि व्यक्तिमत्वाला स्टाइलमध्ये जितके महत्व आहे तितकेच त्याच्या आविष्कारपध्दतीला, शब्दरचनेलाही आहे हे विसरता येत नाही. अभिव्यक्तीशिवाय व्यक्तिमत्वाला प्रकट होताच येत नाही. टांग्यांत बसलेल्या व्यक्तीला आणि टांग्याला वाहून नेण्यासाठी घोडा असावाच लागतो. त्याशिवाय ती व्यक्ती इच्छित स्थळापर्यंत पोचणारच नाही. तसेच साहित्यिकाचे आशयाशी एकजीव झालेले व्यक्तिमत्व अभिव्यक्तीविना रसिकाच्या हृदयापर्यंत पोहोचणारच नाही.' [13] खांडेकर व गोविलकर यांचे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की, साहित्यिकाच्या मनातला आशय त्याच्या अभिव्यक्तीशिवाय वाचकांपर्यंत पोहोचणार नाही. यासाठी त्यांनी टांगा, टांग्यातील व्यक्ती व घोडा

यांचे दिलेले उदाहरण समर्पक वाटते.

आतापर्यंत आपण कादंबरीची भाषाशैली व निवेदनपध्दती याविषयी विवेचन केले. या विवेचनानंतर **महानदीच्या तीरावर** व **झेलझपाट** या दोन्ही कादंब-यामधील भाषाशैली व निवेदनपध्दती पाहू.

कादंबरीची भाषा ...

साहित्यामध्ये आपले भाव, आपले विचार, आपल्या कल्पना, दुस-या व्यक्तीला सहजपणे समजतील व पटतील अशा पध्दतीने सांगणे यास महत्व आहे. भाषा हे त्या त्या समाजमनाच्या आविष्काराचे व भावाभिव्यक्तीचे प्रमुख साधन आहे. हे समाजमन, भाव व्यक्त करण्यासाठी योग्य शब्दांची निवड करणे आवश्यक असते. समाजाचा दर्जा, त्याची संस्कृती, समाजजीवन कळण्यास भाषेची खूपच मोठी मदत होते.

महानदीच्या तीरावर या कादंबरीत दुर्गा भागवत यांनी गोंडांच्या चेटूक, भूतबाधेविषयीचा विश्वास, त्यामुळे पूर्णपणे दैवाधीन बनलेली व अदृश्य आत्म्यांच्या भयाने त्रस्त झालेली मने चित्रीत केली आहेत. तर **झेलझपाट** या कादंबरीत वाकोडे यांनी कोरकू या आदिवासी जमातीच्या समाजजीवनाचे व जीवनपध्दतीचे प्रामाणिक व विश्वासार्ह दर्शन घडविले आहे. प्रेमकथा सांगण्याच्या निमित्ताने कोरकू जमातीचे डौलदार रूप रेखाटले आहे. दुर्गा भागवत यांनी कादंबरीमध्ये नागर भाषेचा वापर केला आहे. पात्राची व निवेदनाची भाषा ही नागर पध्दतीची आहे. तर मधुकर वाकोडे कादंबरीमध्ये नागर भाषा व कोरकूंची (आदिवासींची) बोली भाषा वापरतात. संपूर्ण कादंबरीमध्ये वाकोडे यांनी निवेदनाची भाषा ही नागर भाषा तर पात्रांची भाषा आदिवासी व पात्रानुरूप वापरलेली दिसते. दुर्गा भागवत यांच्या कादंबरीतील आशय आदिवासी जीवनाशी म्हणजेच गोंड जीवनाशी निगडीत आहे. तद्वतच वाकोडे यांच्या कादंबरीतील आशय कोरकू या आदिवासी जीवनाशी निगडीत आहे. दोघेही आपल्या कादंवरीचा आशय व्यक्तिचित्रणातून व निवेदनातून व्यक्त करतात. दुर्गा भागवत कादंबरीमध्ये नागर भाषेचा वापर करून गोंड या आदिवासी जमातीच्या अंधश्रध्दा, मृतात्म्यावरील विश्वास प्रकट करतात. वाकोडे नागर भाषा व आदिवासी भाषा यांचा वापर करून कोरकू जीवनाचे समग्र जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न करतात व आशयास अनुरूप अशी भाषा वापरतात. केरू व फुलय यांची प्रेमकथा सांगण्याच्या निमित्ताने वाकोडे आपल्या भाषाशैलीने कोरकूंच्या धार्मिक श्रध्दा, मंत्रतंत्रावरील व भगतावरील त्यांचा विश्वास, त्यांची उदरनिर्वाहाची साधने, स्त्री-पुरूष संबंधातील त्यांच्या मूल्यप्रणाली, निसर्गाची बदलती रूपे याचे सर्वकष चित्रण करतात. या आदिवासींच्या जीवनाला गतिमान्ता लाभते ती नव्या युगाच्या सुधारणा व सोयींच्या स्पर्शामुळे. या सुधारणा म्हणजे टायगर

प्रोजेक्ट सारख्या, दारिद्र्यरेषेखाली जगणा-या आदिवासींना स्वस्त दरात लुगडी मिळवून देणा-या, गाईगुरांसाठी वैद्यकीय सोयी मिळवून देणा-या, मुलांसाठी अंगणवाडया काढणा-या अशा आहेत. समाजातील भ्रष्टाचार, व्यापा-याकडून होणारी कोरकूंची लुबाडणूक, कोरकूंचे अज्ञान याचे यथार्थ शब्दात चित्रण प्रस्तुत कादंबरीतून वाकोडे यांनी केले आहे. यासाठी व्यक्तिरेखांचे वैभवही योग्यप्रकारे उभे केले आहे.

पात्रांची भाषा ...

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीमध्ये पात्रांची व संवादाची भाषा ही नागर पध्दतीची वापरलेली आहे. उदा. जंगो फूलियाच्या गळयात ढोलके अडकवतो व तिला तो वाजविण्यास व नाचण्यास सांगतो तेव्हा बेला म्हणते - " या मगरीच्या झपाटयानें ढोलाचे तुकडे होतील. कोण देईल तो खर्च भरून ? " त्याचवेळी भीमा फूलियास आव्हान, प्रोत्साहन देताना म्हणतो - " वाजव फूलिया, नाच खोळंबला आहे. "[14] बेला व जंगो या गोंड प्रेमीयुगुलामधील संवादाची भाषा लेखिका नागर पध्दतीची वापरतात. जंगो बेलास जवळ ओढतो तेव्हा ती म्हणते, "इथें नको, आपण दूर जाऊं या. "....... जंगो तिला म्हणतो, "बघ बेला, जणूं तूंच लांबून माझ्याकडे पाहून हंसते आहेस. आणि हातांत हात धरल्यावर मात्र हा बहाणा कां ? सरळ वागणं तुला आजहि वावडं आहे वाटतं ?" जंगो बेलास म्हणतो - " विचार कसला करतेस बेला ? समोर बघ कसे रंग खुलताहेत ते. कां आज बोलायचं नाहीं वाटतं ? " ...... बेला म्हणते - " जंगो, थट्टा पुरे. खरंच, आपण फूलियाला असं वागवायला नको होतं. "[15] यातून लेखिकेने बेलाचा धूर्तस्वभाव तर जंगोचे बेलावरील निष्पाप प्रेम शब्दबध्द केले आहे. " हं ! " जंगो उद्‌गारला. " नदीचा डोह आणि फूलिया हीं सारखींच गहन आहेत. " बेला म्हणते, " नाहीं. जंगो तूं चुकतोस. कुठलीच स्त्री गहन असत नाहीं. आज फूलियाचीं मला पुरतेपणीं ओळख पटली."[16] लेखिका अशाप्रकारे मधुनमधून अलंकारांचा उपयोग करून जीवनविषयक भाष्य करताना दिसतात. भीमा जंगोचा ऐतखाऊपणा पाहून जंगोस म्हणतो - "लाज नाहीं वाटत तुला, फुकट पोळासारखं चरायला ? तुझा संसार मी कुठवर चालवूं ?"[17] लेखिका अशाप्रकारे जंगोची कष्ट न करण्याची प्रवृत्ती शब्दांकित करतात. बेला फूलियास तिचे मूल नाळवारीसह ओटीत मागते तेव्हां फूलिया म्हणते - " मूल वांचो आणि वाढो. दुसरं कांहीं मला नको. "[18] मृत्यू समीप आलेला जंगो फूलियास म्हणतो - " मी लवकर बरा होईन, फूलिया. मग आपण वेगळे राहूं. भीमाच्या जवळच पण वेगळे. सिंगा असूं दे त्यांचा. तुला मी आणि मला तूं."[19] अशाप्रकारे लेखिका बदललेला व फूलियावर प्रेम करू लागलेला जंगो चित्रीत करतात.

फूलिया जंगोचे सांगण्यावरून स्वतःच्या मुलाच्या हातातील बासरी काढून घेण्यास सिंगास बोलावते तेव्हा सिंगा म्हणतो - "मी नाहीं येत. मला ही बांसरी हवी. ते का आता उठणार आहेत? मी त्यांचा मुलगा आहे. त्यांचं तें सर्व माझंच आहे. तूं कोण मला विचारणार ?"[20] सिंगाचा उद्दामपणा लेखिका या शब्दात चित्रीत करतात.

फूलिया व जंगो या पतीपत्नीची, बेला व जंगो या प्रेमीयुगुलाची, भीमा व फूलिया यांच्यातील, सिंगा व जंगो या पितापुत्राची, भूमका या मांत्रिकाची, माठी व लछमन यांच्यातील, माठी व फूलिया या दोघींमधील या सर्व पात्रांची भाषा लेखिका नागर पध्दतीची वापरतात. सर्व पात्रांच्या भावभावना त्यांचे स्वभाव हे देखील प्रकट करताना लेखिका नागर भाषाच वापरताना दिसतात. ही सर्व पात्रे गोंड या आदिवासी जमातीतील आहेत. नागर भाषेमुळे कादंबरीमध्ये स्वाभाविकता येत नाही. गोंड या आदिवासी भाषेचा वापर न केल्याने ह्या सगळया व्यक्तीरेखा त्या वातावरणातील, गोंड जमातीतील वाटत नाहीत. त्यामुळे दुर्गा भागवतांच्या ' महानदीच्या तीरावर ' या कादंबरीतील भाषा आदिवासी (गोंड) जीवनाचे चित्रण करण्यास अनुरूप वाटत नाही. या कादंबरीतील पात्रांची भाषा नागर वळणाची पण आदिवासी बोलीचा काहीएक प्रमाणात प्रभाव असलेली अशी असती तर कादंबरीतील आशयाला ती भाषा अधिक अनुरूप वाटावी अशा प्रकारची झाली असती.

मधुकर वाकोडे ' झेलझपाट ' या कादंबरीत संवादाची, पात्राची कोरकू (आदिवासी) भाषा वापरतात. उदा. फुलय रानातून मोहफुलं वेचून घरी येते. घरात पाणी नाही पाहून विहीरीवरून पाणी आणते व अंगणात पडलेल्या मोपास (वडिलांना) विचारते, "आम शिडू नुयेन ? "........ मोपा फुलयला म्हणतो - " दा ऽ आ ऽ । इंज नुयेन शिडू आमा साधो । "[21]

लेखक केरू व फुलय या कोरकू प्रेमीयुगुलाची संवादाची भाषा आदिवासी पध्दतीची वापरताना दिसतात. केरु फुलयचे कानात हळूच कुजबुजतो. " फुलय ऽऽ डोंगोर जुलू लाकेन. "......... फुलय म्हणते, "आम इंजगेन ब्याव डाडा बा की च्यूज ? "[22] ही पात्रे कोरकू जमातीतील आहेत. वाकोडे यांनी पात्रांच्या तोंडी कोरकू भाषा वापरलेली आहे. ती जशीच्यातशी आली आहे. त्यांनी या आदिवासींची बोली जाणूनबुजून कादंबरीत घेतलेली दिसते. ही भाषा दुर्बोध आहे, पण ही दुर्बोधता नाहीशी करण्याचे कामही लेखकाने त्यापुढील निवेदनातून केलेले आहे. आदिवासींच्या बोलीचा, शब्दांचा, वाक्यांचा अर्थ लेखक त्या वाक्यापुढेच अगदी सहजगत्या देतात. त्यामुळे वाचकांना ते वाचताना अडखळल्यासारखे अथवा समजत नाही असे वाटत नाही. उदा. "हाला ऽऽ जा, आमा इंज जापाय ? लुबू बा की खिकडी ?"नाही जा ऽऽ असा पदर ओढायला मी का तुझी बायको लागते ? .... " डोगे, इंज आम खे ढेगाटे ठेचा की ऽ मी बा ऽऽ । " पहा बरं ऽ मी गोटयानं मारीन

हं ऽऽ ।[23] वरील संवादातून लेखक कोरकूंच्या निरागस प्रेमाचे दर्शन मार्मिक शब्दात घडवितात.

आदिवासींची दुर्बोध भाषादेखील वाचकाना समजावी यासाठी तिच्यामध्ये सुबोधता आणण्यास लेखक नागर भाषेत त्याचे अर्थ पुढे सांगतात. आदिवासी भाषेच्या वापरामुळे कादंबरीत वैशिष्ट्यपूर्ण वातावरणनिर्मिती करण्यास ते यशस्वी झालेले आहेत.

लेखक संपूर्ण कादंबरीत पात्रानुरूप भाषा वापरतात. जसे कासम मण्यारीवाला, रहिमशेठ, खंडेलवाल ही पात्रे व्यापारी आहेत, त्यांची भाषा त्याना अनुरूप अशी वापरलेली आहे. जसे - कासम मण्यारीवाला हा गौलखेडच्या बाजारला जाताना कोरकू ढाण्यातही आपल्या मालाची विक्री करतो. त्यावेळी " ए सानी ऽ ले ऽ लिज्या ऽऽ ।"........"आरे ऽ लिज्या ऽ पैसा बादमे लेंगा. तू मोपामामाकी लडकी हैस ना ऽ । "[24] असे तो फुलयला म्हणतो. या उल्लेखातून लेखक कासमच्या व्यापारीवृत्तीवर प्रकाश टाकतात.

" अरे ऽ आज रातमें मटन खाणेका इरादा है हमारा मोपामामाके साथ. हम बाजारसे आते वक्त सब लाएंगा ऽऽ ।"[25] दुर्बल मोपाचा फायदा घेण्याच्या कासमच्या वृत्तीचे लेखक यथार्थ शब्दात चित्रण करतात. तसेच त्यांचे पात्रानुरूप भाषा वापरण्याचे कसब दिसून येते.

रहिमशेठ एका झाडाच्या सावलीत दुकान थाटून बाजारात जाणा-या कोरकूंच्या (बुडाहिराजींच्या) डोक्यावरील मालावर झडप घालतो. लेखक रहिमशेठ व बुडाहिराजी यांच्यातील पुढील संवादाने हा प्रसंग अतिशय सुरेख शब्दात चित्रीत करतात.

" अरे वो गफ्फार ऽ, मामाकी तुवर गीन ले ऽऽ. "

" अरे बुढापटेल. क्या लाया बंडीमे ऽ । " रहिमशेठ.

बुडाहिराजीनं आपली बंडी रोकली नमाइनं म्हणाला,

" मोहा लाया रे सेठ. "

" अच्छा कर्जा हमको मंगता. और माल दुसरोको बेचता । "

" अैस्सा नही ऽ. " बुडाहिराजी खजिल होऊन म्हणाला.

" फिर कैसा ? " आपल्या खिशातील डायरी काढून पानं चाफलत म्हणाला,

" पिछला पैसा दिया तुने. "

" हांटी ऽ आ ऽ, दिलाली के टेम दिया था रे सेठ " बुडाहिराजी.

" साठ रूप्या लेना है तेरेसे ऽऽ समझा. " दुपट्टयाच्या शेमल्यानं घाम पुसता पुसता रहिमशेठनं बाकी सांगितली.

" हमने तेरा पैसा दिया ऽ सेठ. " बुडाहिराजी काकुळतीनं म्हणाला.

" तो सुव्वर के बच्चे ऽ हम क्या झूठ बोलता. " रहिमशेठ मगूरीनं म्हणाला.[26]
अशाप्रकारे रहिमशेठची मगूर, व्यापारीवृत्ती सुरेख शब्दात तर बुडाहिराजीची दयनीय अवस्था मार्मिक शब्दात लेखकाने चित्रीत केली आहे. प्रसंगानुरूप भाषा वापरून लेखक आदिवासींना लुबाडणा-या, फसविणा-या व त्यांच्या मालावर झडप घालणा-या रहिमशेठच्या वृत्तीचे व लुबाडल्या जाणा-या कोरकूंचे यथार्थ चित्रण करताना दिसतात.

दारूडया संपतचे दारू पील्यानंतरचे बडबडणे लेखकाने जसेच्या तसे शब्दांकित केले आहे. लेखक लिहितात - भेलकांडत तो वा-याशी बोलू लागला, " हट ऽ ऽ हटा ऽ ऽ व म्हन्त्येत गरिबी. अन् सो ऽ ऽ सो ऽ ऽ अरे घूत सा ऽ ले. अरे ऽ ऽ थूत ऽ थूत् ऽ । इका सोऽस्सायटीतला कपळा ऽऽ अन् घा ऽ ला घा ऽ ला ऽऽ .... गां ऽ गांडीत घाला म्हना नोटा. पन....... मी म्हन्तो ऽऽ हे बोल्यालेई मर्द ...... मर्द पायजे मांनू ऽ स. काय म्हन्तो ऽ ...... "[27]
अशात-हेने दारूडया संपतला अनुरूप अशी भाषा लेखक वापरतात.

केरू व फुलय या प्रेमीयुगुलामधील भाषा लेखकाने अतिशय सुरेख व आदिवासी भाषेचा उपयोग करून लिहिली आहे. यातून लेखकाची आदिवासी भाषा वापरण्याची लकब दिसून येते.

अशात-हेने पात्रानुरूप व प्रसंगानुरूप अशी भाषा लेखकाने प्रस्तुत कादंबरीत वापरली आहे.

स्त्री पात्रांचे चित्रण करताना लेखक अतिशय लाघवी, सुरेख भाषा वापरतात. फुलयचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' त्या रानफुलांच्या ताटव्यात आपल्या तजेलदार रूपानं मुसमुसलेल्या अंगोपांगानं उठावदार दिसत होती...... तिच्या चेह-यावर झाडाआडून वर येणारा चन्द्र प्रकाशाची नक्षी उठवत होता. गोंदणाशी स्पर्धा करणारी ती नक्षी वेधक दिसत होती. नाचता नाचता लाल झंपरात न मावणारं तारूण्य ती उलटया पदराखाली झाकत होती.' [28]. अशाप्रकारे लेखकाने फुलयच्या तारूण्याचे सुंदरतेचे चित्रण हुबेहूब शब्दांकित केले आहे. यातून लेखकाच्या सौंदर्यविषयक दृष्टीचेही दर्शन घडते. रमोतीचे वर्णन करताना ते लिहितात - ' मध्यमवयाची, खटयाळ गळयात हम्मल, ... अंगापिंडानं शिसमच्या लाकडासारखी. '[29] या वर्णनातून लेखक कोरकू स्त्रियांच्या नेमकेपणाचे, त्यांच्या मजबूत शरीराचे अतिशय परिणामकारक शब्दात वर्णन करतात. उपमा अलंकाराचा वापर करून लेखक ती ती पात्रे अधिक चित्तवेधक बनवतात.

स्त्रीसौंदर्याचे वर्णनाप्रमाणे स्त्रीचे वेगळे रूपही विशिष्ट भाषाशैलीत उपमा अलंकाराचा वापर करून लेखक चित्रीत करतात. ' कधी ती त्याला उग्र देवीगत दिसत होती तर कधी शिसमच्या काष्ठशिल्पासारखी भासत होती. '[30] अशाप्रकारे लेखक नागर लोकांना परिचित अशा देवीची तसेच

लाकडी कलाकृतीची उपमा देवून कोरकू स्त्रीचे नेमक्या शब्दात चित्रण करतात.

स्त्रीच्या भावुक, प्रेमळ मनाचे, तिच्यातील स्त्रीसुलभ भावनांचे लेखक अतिशय सुरेख शब्दात वर्णन करतात. उदा. पायरीवर बसल्या-बसल्या अंगणवाडीच्या बाईच्या मनात येते, ' ह्या अभागी गाईत अन् माझ्यासारख्या करंट्या बाईत काय फरक ? तिचं दुधाळपण संपलं..... वासरं पैदाकरणं संपलं म्हणून रस्त्यावर बसली. कुण्या कावळयानं मारावी टोचणी...... कुण्या स्त्रिनं दयेपोटी दाखवावं पाणी, किती करंटेपणा ? आपलंही तारूण्य........ मातृत्वाची क्षमता संपली तर कोण पत्करणार ? कावळयांच्या टोचण्या ... जीवाच्या जाचण्या कोण थांबविणार ? कसही करून का होईना ..... आपण लग्न केलं पाहिजे.' [31] कोणतीही वस्तु जोपर्यंत उपयोगाची असते तोपर्यंतच लोक त्या वस्तुकडे लक्ष देतात, ती वस्तु निरूपयोगी होताच कोणीही त्याकडे लक्ष देत नाही. तद्वतच स्त्रियांच्यात जोपर्यंत मातृत्वाची क्षमता, तारूण्य असते तोपर्यंत तिने लग्न केले नाही तर पुन्हा कोणीही तिचा पत्नी म्हणून लवकर स्वीकार करीत नाही ही वास्तवता व अंगणवाडीच्या बाईच्या मनाची व्यथा समर्पक उदाहरण देऊन लेखक योग्य शब्दामध्ये चित्रीत करतात.

स्त्रियांच्या भावना प्रतिकांचा वापर करून लेखक अतिशय वेधक शब्दात मांडतात. उदा. फुलय खांबाला रेलून आरशात पाहात बसली होती. त्यावेळी तिचे लक्ष झापावरच्या चिमण्यांकडे जाते. झापाच्या चौपटीवर बसलेली चिमणी तिच्याकडं तोंड वळवून बसली होती. आणि कणगीवरचा चिमणा फडफडत यायचा .... पुन्हा फडफडत जाऊन कणगीवर बसायचा. आपली चोच..... मान वेडीवाकडी करीत चिमणा फडफडत उडायचा...... पुन्हा कणगीवर जाऊन रुबाबात मान हलवून उडायचा. चिमणी बसल्या जागी एक इंच इकडेतिकडे पावलं वळवायची नि चिवचिवाट करायची. कितीतरी वेळ ती देहभान विसरून त्या दृश्याकडं पाहत होती. चांगली कबरी जाडजूड मान वेळावणा-या त्या चिमण्याकडं पाहून ती आतून आतून उमलत आली. रंग फुलवत आली आणि खाली मान घालून त्या चिमण्याला तिनं शिवी हासडली - ' सुकळी खिज्या ऽ ऽ । ' [32] या प्रसंगातून लेखाकाने फुलयच्या मनाचे नेमके चित्रण केले आहे. एखाद्या स्त्रीच्या मनातील भाव नेमके मांडणे ही गोष्ट तशी कठीण असते. पण वाकोडे यांनी नेमकेपणाने ते चित्रण केल्याने मानवी मनाचा नेमका वेध घेण्याचे लेखाकाचे कौशल्य येथे प्रकट झालेले दिसते.

पुरूष पात्रांचे वर्णन वाकोडे कादंबरीत त्या त्या पात्राला अनुरूप भाषा वापरून करतात. केरूचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' उंच शेलाटया अंगाचा. धोतर न नेसता पायजमा शर्ट घालणारा ..... डोक्यावरील केसांचा भांग पाडणारा. कपाळावर भुवयांच्या मध्यभागी मस. जणू

कायमचा टिळा. डोळे बेलके. रंगानं काळाशार. पण तुकतुकणारा तजेलदार काळेपणा. चेहरा पसरट..... नाक बसके. नुकतीच ओठावर मिसरूड हरळसारखी वर डोकावणारी. हनुवटीवर फक्त चार-पाच केसांचा एक पुंजका उगवलेला.' 33 कोरकूंचा नागर लोकांशी संपर्क आल्याने कोरकूंच्या पोशाखात होत असलेल्या बदलाचे दर्शन केरूच्या पोशाखाच्या वर्णनातून होते. पात्राचे तपशीलवार वर्णन अलंकारांचा वापर करून लेखक ती पात्रे वाचकापुढे जशीच्या तशी उभी करतात. कासम मण्यारीवाल्याचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' चंद्रकोरीसारख्या दाढीवर त्याचं टरबुजासारखं तोंड ठेवलेलं दिसत होतं.' 34 टरबूज हे फळ नागर लोकांना परिचित असे आहे. अशा परिचित शब्दांचा वापर करून लेखक ती पात्रे वाचकांपुढे हुबेहूब साकार करतात. यथार्थ शब्दांचा, उपमा अलंकाराचा वापर त्यासाठी करतात.

पात्रांचे स्वभावदर्शन लेखक अतिशय वेधक शब्दात करतात. कासम मण्यारीवाल्याचा बायकांशी लगटपणा करण्याचा स्वभाव चित्रीत करताना लिहितात - ' बसता बसता तिरप्या नजरेनं फुलयला त्यानं चाटून घेतलं.' 35 तसेच ' राघूसोबत भरारी मारणा-या मैनाकडे डोमकावळयानं पहावं तसा कासम फुलयकडं पाहत राहिला.' 36 कासमचा आदिवासी स्त्रियांविषयीचा कामुक स्वभाव लेखक यथार्थ शब्दात चित्रीत करतातच शिवाय निसर्गामधील पाखरांच्या स्वभावाच्या माध्यमातून लेखक त्या पात्रांच्या स्वभावाचे योग्य शब्दात चित्रण करताना दिसतात.

मोपाच्या लाचार, लोचट स्वभावाचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' जेवणा-या माणससमोर बसलेला कुत्रा जसा जेवणा-या माणसानं ताटात हात घातला की खाली पाहतो नि तोंडात घास टाकला की वर पाहतो तसा विठूनं कप भरला त्यावेळी मोपा खाली कपाकडे पाहत होता.' 37 परिचित अशा प्राण्याच्या स्वभावधर्माचे वर्णनातून मोपाच्या लाचार व दारूडया स्वभावाचे नेमकेपणाने वर्णन करण्याचे लेखकाचे कौशल्य दिसते. यातून लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची कल्पना येते.

कोरकूंचे वर्णन करताना वाकोडे लिहितात - ' मोहरमच्या वाघानं अजून जंगलाचा वाघ पाहिला नाही का ? केरूला कळलं तर ? कुठं माझा जंगली वाघ आणि कुठं हा सरडा ? ' 38 या वर्णनातून लेखक कोरकूंच्या ताकदीचे, त्यांच्या निर्भिडपणाचे योग्य शब्दात वर्णन करताना दिसतात.

याप्रमाणेच वाकोडे यांनी रहिमशेठ, खंडेलवाल, डॉ. टिकेकर या पात्रांची चित्रणे त्यांच्या स्वभावांना अनुरूप अशी शब्दबध्द केलेली आहेत. तसेच विरोध व लय तंत्राचा वापर करून कोरकू ढाण्याचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' ढाणा सुरावटीत रंगला. वारा सुरांचा सुगंध डोंगर द-यात उधळू लागला. गवळी ढाण्यात बोंबांचा बेसूर महापूर लोटला होता.' 39 गवळी ढाणा व

व कोरकू ढाणा यांचे गुणधर्म एकमेकांशी मिळत नसून उलट दोघांमध्ये विरोध दिसतो. कोरकू ढाण्याचे अतिशय नेमकेपणाने दर्शन घडविताना कादंबरीमध्ये लालित्य आणण्याचे लेखकाचे कसब येथे दिसून येते.

अशात-हेने कोरकू जमातीचे चित्रण करण्यास लेखक मार्मिक शब्दयोजना करून आशयास अनुरूप अशी वातावरणनिर्मिती करतात. त्यामुळे कादंबरीत स्वाभाविकता, वास्तवता निर्माण झालेली दिसते.

वाकोडे प्रस्तुत कादंबरीमध्ये वाक्प्रचार, म्हणी यांचाही वापर करताना दिसतात. शासन योजनेनुसार शिकारीस बंदी होती. तरीही कोरकूंनी होळीसणासाठी परंपरेनुसार शिकार करण्याचा बेत आखलेला असतो. ही बातमी कोणासही कळता कामा नये अशी दक्षता घेणे आवश्यक होते. शंकर गवळयास हे माहित होते. त्यानेही कोणास हे न सांगण्याचे वचन दिले हे सर्व लेखक मोजक्या शब्दात सांगताना लिहितात - ' शंकर गवळयानंही गवगवा न करण्याचा शब्द दिला. '[40] आदिवासी स्त्रिया सोसायटीतून दोन रूपये घेऊन आंगठा उठवून जात होत्या हे पाहून केरू यासंबंधी कुतूहलाने टेमरेकडे चौकशी करतो. टेमरे त्याला या भ्रष्टाचारी प्रकरणाबद्दल माहिती देतानाच गप्प होतो त्यावेळी केरू त्यास आमदाराची भिती घालतो, परंतु आमदाराचेही या गोष्टीत काहीही चालणार नाही याची जाणीव केरूस टेमरे करून देतो व तो त्याला म्हणतो. ' तू या प्रकरणासंबंधी काहीही चौकशी करू नकोस, जर या प्रकरणात तू लक्ष घातलेस तर त्याचे परिणाम वाईट होतील.' हे वास्तव लेखक थोडक्या शब्दात योग्यपणे सांगताना लिहितात - ' तू लहान तोंडी मोठा घास घेशील अन् तोंड फाटून जाईल ! '[41] कादंबरीतील प्रसंग, पात्रे अधिकाधिक परिणामकारक शब्दात मांडण्यासाठी व कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशय सांगण्यासाठी वाक्प्रचार व म्हणी यांचा नेमकेपणाने उपयोग करण्याचे लेखकाचे कौशल्य येथे प्रकट झालेले दिसते. त्यामुळे भाषेतील लालित्यही वाढलेले दिसते.

दुर्गा भागवत **महानदीच्या तीरावर** या कादंबरीमध्ये नागर भाषा वापरतात. कादंबरीतील पात्रे, अधिकाधिक परिणामकारकरित्या चित्रीत करण्यास उपमा, उत्प्रेक्षा यासारख्या अलंकारांचा वापर करतात. उदा. ' भीमा बैलासारखा अहर्निश कामांतच गुरफटलेला असे. '[42] ' फूलिया म्हशीसारखी मठ्ठ आणि मुकी. '[43] ' कलाकरणीचें घर म्हणजे रानगांवचा कुंटणखानाच. '[44] अशाप्रकारे लेखिका नागर जीवनाशी निगडीत अशा उपमांचा वापर करून त्या पात्रांचे, त्यांच्या स्वभावाचे, घटनांचे वर्णन अधिकाधिक परिणामकारकपणे करण्याचा प्रयत्न करतात. तसेच वाक्प्रचारांचा वापर करून कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशय प्रकट करण्याचाही प्रयत्न लेखिकेने

केलेला आहे. उदा. ' कोणाहि मान्त्रिकाच्या कह्यांत न रहाणारें हें पिशाच्च आहे. ' [45] यातून गोंडांना मृतात्म्याविषयी वाटणारी भिती लेखिका परिणामकारक शब्दात चित्रीत करताना दिसतात. ' जातीच्या रिवाजाप्रमाणें मोठया भावजयीचें दिराशी अघळपघळ वागणें कुणीच खिजगणतींत घ्यायचें नाहीं. ' [46] वाक्प्रचाराचा वापर करून गोंडांच्या स्त्री-पुरूषसंबंधामध्ये असलेले वेगळेपण लेखिका चित्रीत करतात. ' शेजारणींचें उट्टें बेला फूलियावर काढी ' [47] अशाप्रकारे वाक्प्रचाराचा वापर करून वेलाच्या मत्सरी व सूडबुध्दीच्या स्वभावावर लेखिका प्रकाश टाकतात. अशात-हेने दुर्गा भागवत यांनी थोडया शब्दात अधिक आशय प्रकट करण्यासाठी वाक्प्रचारांचा वापर कादंबरीत केलेला दिसतो. तसेच पात्रांचे व गोंडांच्या रिवाजाचे, त्यांच्या रूढींचे, अंधश्रध्दांचे परिणामकारक वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात - दुर्गा भावगत प्रस्तुत कादंबरीत पात्रांची भाषा नागर पध्दतीची वापरतात. त्यात अलंकार वाक्प्रचार यांचा मधुनमधून वापर करतात. गोंड पात्रांच्या तोंडी नागर भाषा वापरल्याने कादंबरीमध्ये स्वाभाविकता येत नाही. या व्यक्तीरेखा त्या वातावरणातील वाटत नाहीत. पात्रांची भाषा नागरवळणाची पण आदिवासी बोलीचा काही एक प्रमाणात प्रभाव असलेली अशी असती तर कादंबरीतील आशयाला ती भाषा अधिक अनुरूप वाटावी अशाप्रकारची झाली असती असे वाटते.

वाकोडे आपल्या कादंबरीत पात्रांची भाषा त्या त्या पात्राला अनुरूप अशी वापरतात. लेखकानें पात्रानुरूप व प्रसंगानुरूप भाषा वारलेली दिसते तसेच आदिवासी भाषेचाही मधुनमधून वापर केलेला दिसतो. कांदबरीतील ही भाषा दुर्बोध असते. परंतु वाकोडे यांनी वापरलेली कादंबरीतील आदिवासी भाषा समजते. कारण आदिवासी भाषेतील वाक्यांशाचा अर्थ ते नागरभाषेत सहजतेने देतात. तो अर्थ त्या वाक्याशी समरस झालेला आहे असेच वाटते. त्यामुळे त्या अर्थ देण्यामध्ये कृत्रिमता वाटत नाही. स्त्री पात्रांचे व पुरूष पात्रांचे चित्रण करताना लेखकाची भाषा बदलताना दिसते. परंतु लेखक त्या पात्रांना योग्य अशीच भाषा वापरतात. यथार्थ भाषाशैलीमध्ये लेखकाने पात्रांचे प्रसंगांचे रेखाटन केले आहे. कादंबरीतील व्यक्तीरेखा त्या त्या वातावरणातील वाटतात. त्यामुळे कादंबरीमध्ये आशयानुरूप वातावरणनिर्मिती होण्यासही मदत झाली आहे. अधिकाधिक परिणामकारक चित्रण करण्यासाठी लेखकाने वाक्प्रचार, म्हणी, अलंकार यांचा मधुनमधून वापर केलेला आहे.

निवेदनपध्दती ...

कादंबरीमध्ये भाषाशैलीला महत्व असते. तद्वतच कादंबरीचा आशय ज्या पध्दतीने व्यक्त केला जातो त्या निवेदनपध्दतीस आविष्कारास, अभिव्यक्तीस महत्व असते. हे निवेदन जीवनाशी निगडीत असते. निवेदनातून लेखक त्या पात्रासंबंधी, वातावरणासंबंधी सांगत असतो. निवेदनातून

लेखकाची जीवनाकडे पहण्याची दृष्टी कळते.

दुर्गा भागवत **महानदीच्या तीरावर** या कादंबरीमध्ये नागर भाषेतून निवेदन करताना दिसतात. लेखिका पात्रासंबंधी निवेदन करतात व ती पात्रे अधिक सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. उदा. ' मुलींच्या उखाण्यांत, दगड, म्हैस, मालवाहू गोणी, शंख पाठीवर वागवणारी गोगलगाय वगैरेंचे उखाणे हमेशा फूलियाला उद्देशून असत. ' 48 या निवेदनाद्वारे लेखिका फूलियाच्या राकट, मठ्ठ व ओंबडधोबड अशा शरीरयष्टीचे वर्णन करताना दिसतात. ' बायकी नख-यानीं परिपूर्ण, स्त्रियांचा अत्यंत आवडता आणि स्तुतीनें विलक्षण चढून गेलेला जंगो, फूलियाला तोडून बोलण्याची एकहि संधि तो गमावीत नसे. ' 49 यातून लेखिका जंगोच्या स्त्रीलंपट व स्तुतीप्रिय स्वभावावर तसेच त्याच्या फूलियाविषयीच्या द्वेषावर प्रकाश टाकताना दिसतात.

निवेदनातून लेखिका गोंड जमातीचे विशेषही सांगतात. ' जातीच्या रिवाजाप्रमाणें मोठया भावजयीचें दिराशीं अघळपघळ वागणें कुणीच खिजगणतींत घ्यायचें नाही. ' 50 या निवेदनाद्वारे लेखिका गोंड जमातीतील स्त्री-पुरूष संबंधावर प्रकाश टाकतात.

लेखिका गोंडच्या संस्कृतीचे, जीवनाचे, त्यांच्या स्मशानभूमीचे, तेथील भयानक डोहाचे, गोंडांच्या अंधश्रध्दांचे, त्यांच्या मृतात्म्यावरील विश्वासाचे नागर भाषेत निवेदन करतात व निवेदनातून गोंडांच्या दैवाधीन बनलेल्या मनःप्रवृत्तीचे दर्शन वाचकांना घडवितात. अद्‌भुत व गूढ अशाप्रकारचे वातावरण लेखिका आपल्या निवेदनातूनच निर्माण करतात.

दंतकथेत ज्याप्रमाणे कथा निवेदीत केली जाते तद्वतच लेखिका कांदबरीतील सर्व कथानक निवेदन करतात. मधुनमधून पात्रांचे संवाद, अलंकार, वाक्प्रचार यांचा वापर करतात.

पात्रांच्या मुखातून म्हणजेच अप्रत्यक्षपध्दतीने लेखिका निवेदन करतात. उदा. बेला म्हणते - ' मनासारखी बायको असली तरच नवरा कमाई भली करूं शकतो. ' 51 फूलिया म्हणते - ' नव-याचे साहाय्य असल्यावर स्त्री काय करूं शकणार नाहीं ?' 52

गोंड जीवनातील अद्‌भुतता, गूढता, त्यांचा मृतात्म्यावरील विश्वास व त्यामुळे दैवाधीन बनलेली त्यांची मने यांचे निवेदन करीत असतानाच लेखिका जीवनाविषयीची भाष्ये करणारी वाक्ये टाकतात. उदा. ' प्रेमाची वाट किती भयाण आणि वांकडी असते, हें तिला आतां उमजलें. ' 53 ' अबोल माणसं नदीच्या डोहासारखीं घातुक असतात. ' 54 ' प्रबळ माणसांना नामोहरम करणा-या साध्या आणि निष्कपट माणसांबद्दल बहुधा अप्रीतिची भावना समाजांत वावरत असते. ' 55

प्रस्तुत कादंम्बरीचा चित्रणविषय आदिवासी जीवन हा आहे. लेखिका निवेदन,

वातावरणनिर्मिती नागर भाषेतून करतात. स्वतःच्या सभोवतालचे जीवनच त्या निवेदीत करीत आहेत असे वाटते. तसेच कादंबरीमध्ये विषयानुरूप वातावरणनिर्मिती झाली आहे असे वाटत नाही. त्यामुळे ही कादंबरी वास्तवापासून दूर जाते.

झेलझपाट या कादंबरीमध्ये वाकोडे यांनी काही पात्रांची भाषा आदिवासी पध्दतीची वापरली असली तरी नागर भाषेतून निवेदन केले आहे. केरू व फुलय या कोरकू प्रेमीयुगुलाच्या प्रेमाची हळुवार कहाणी लेखकाने निवेदीत केली आहे. या कहाणीबरोबरच अनेक उपकथानके, आदिवासी संबंधीत सामाजिक प्रश्न लेखकाने यथार्थ भाषेत निवेदीत केले आहेत. यासाठी व्यक्तिचित्रणांचे वैभवही उभे केले आहे. लेखक आदिवासींचे प्रश्न, त्यांची अवस्था, कधी प्रत्यक्षपध्दतीने तर कधी पात्रांचे मुखातून निवेदीत करताना दिसतात.

आदिवासी समाजाचे दर्शन घडविताना निवेदनातून लेखकाचे भ्रष्टाचारविरोधक व समाजसमीक्षक मन प्रकट झाले आहे. उदा. संपत दारू पिवून भेलकांडत बोलू लागतो, ' गरिबी हटाव म्हणतात आणि सोसायटीमधून कोरकू बायांसाठी स्वस्त दरात मिळणा-या कपडयावरही झपाट मारून व्यापारी (जांगडी) पैसा कमवतात.' अशाप्रकारे भ्रष्टाचारी लोकाविषयी लेखकाचे भ्रष्टाचारविरोधी मन संपत या पात्राच्या मुखातून उफाळून आलेले दिसते.

कॅफोसाठी अंगणवाडीच्या बाईंना नेण्यास जेव्हा ड्रायव्हर येतो तेव्हा बाई रागाने म्हणतात, " बिडिओला सांगा, तुझी बायको पाठव म्हना डाकबंगल्यावर...... कॅफोसाठी. तुझे घोटाळे तुझी बायको एका रात्रीत निस्तरून टाकील म्हना ! " [56] यातून लेखकाचे स्त्रीजातीवर होणा-या नाहक अन्यायाविरूध्द व मोठया लोकामध्ये असणा-या साळसूद भ्रष्टाचाराविरूध्दचे उफाळून आलेले मन प्रकट होताना दिसते.

आदिवासींची व्यसनाधीनप्रवृत्ती, सरकारी योजना, कोरकूंचे धर्मांतराचे होत असलेले प्रयत्न या सर्व गोष्टी पाहून लेखकाचे मन उसळी मारून केरू या पात्राच्या मनातील भावनांद्वारे प्रकट होते. ' मुसलमानांचा झेलझपाट...... खिश्चनांचा धर्मप्रसार..... लालपरीची आता दारूला मिळालेली साथ.... सरकारी मोसंबी नारिंगी..... टायगर प्रोजेक्ट..... ह्या सर्व गोष्टी कोरकूंच्या जीवावर उठल्या आहेत. आजार वेगळे ..... उपचार निराळे आणि लोक अडाणी...... गरीब, असा सारा हैदोस आहे. ' [57] तसेच धर्मांतर व कोरकूंची व्यसनाधीनता यामुळे उध्वस्त होणारे कोरकूंचे जीवन पाहून खंडेलवाल म्हणतो, " कुछ दिनोंबाद या कुछ सालोंबाद यह ऐसाही चला तो ठीक, नहीं दवा को भी नही मिलेगी. " [58] या निवेदनातून कोरकू जमात उध्वस्त होऊ पहात आहे. याला समाजातील

भ्रष्टाचार, स्वार्थी व्यापारी, कोरकूंचे अज्ञान व व्यसन कारणीभूत आहे हे लेखकास सूचीत करावयाचे आहे. तसेच लेखकास कोरकू जमातीविषयी चिंता वाटत आहे हे या निवेदनातून जाणवते.

आदिवासींना लुबाडणा-या, त्यांना फसविणा-या त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणा-या समाजातील अनेक व्यक्तींचे, पात्रांचे लेखकाने अतिशय समर्थपणे निवेदन केले आहे.

समाजामध्ये सशक्तांकडून दुर्बलांचे शोषण केले जाते. कोरकूंच्या दुर्बलतेचा फायदा घेणारे लोकही या समाजामध्ये आहेत. याचेही निवेदन लेखकाने कासम मण्यारीवाला या पात्राद्वारे केले आहे. व्यसनी व दुर्बल अशा मोपाच्या मुलीवर कासम वाईट नजर ठेवतो. तिच्या दुर्बलतेचा फायदा घेतो. रहिमशेठ व खंडेलवाल ही दोन्ही पात्रेही कोरकूंच्या दुर्बलतेचा, अज्ञानाचा फायदा घेणारी आहेत. स्वभावानुरूप त्या त्या पात्रांचे निवेदन लेखकाने केले आहे.

कोरकूंमध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत ही लेखकाची अतूट इच्छा आहे. डॉ. टिकेकर संकरित गाईंची माहिती देण्यास ढाण्यात ठाण मांडून बसतो. डॉ. टिकेकर या पात्राद्वारे कोरकूंना सुधारणावादी योजनांची माहिती मिळाली पाहिजे, तसे प्रयत्न झाले पाहिजेत हे लेखकास सूचीत करावयाचे आहे.

कोरकूंना सुशिक्षित करण्यासाठी, त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण होण्यास कोरकू भाषेतून शिक्षण दिले जाणे हे गरजेचे आहे. कोरकूंची ही समस्या लेखक केरू या पात्राद्वारे निवेदीत करतात. यातून लेखकाची सामाजिक सुधारणावादी दृष्टी दिसून येते.

लेखक निवेदनातून कोरकूंचे निसर्गनिष्ठ जीवन परिणामकारकपणे प्रकट करतात. जसे - कोरकू ढाणा व गवळीढाणा असा दोन भागात विभाजन करणारा सलोन्याला जाणारा रस्ता, टेकडीच्या घसरगुंडीवरची कोरकूंची चौकोनी बर्फीच्या कापांच्या चळतीसारखी दिसणारी वावरं, गवळी ढाण्यात दुधातुपाचा घमकारा तर कोरकू ढाण्यात दारूचा भपकारा, एकीकडे सोन्याला सुस्ती आणणारे पिवळेपण तर दुसरीकडे अंधाराशी कुस्ती खेळणारं काळेपण, टेकडीच्या माथ्यावरचा कोरकू ढाणा, तीस चाळीस झोपडयांच्या समोरासमोर दोन रांगा, मधोमध रस्ता, झोपडीपुढचा अंगणवजा सारवलेला ओटा, बासांच्या तट्यांची बाज, शिंगाडया फटाडया बंडया, गावच्या शीवेलगतचे झाडाखालचे मुंडाचे ठाणे, मूंड कोरकूंचे पितर म्हणून नागाच्या प्रतिमा, माथ्यावर सूर्याचे प्रतिक इत्यादी.

कोरकूंचा मासळया पकडण्याचा स्वभावधर्म लेखक मार्मिक शब्दात निवेदीत करतात. ' दहा रूपये मजुरी जरी दिली तरी कोरकू कामावर जाणार नाही जर त्याच्या डोक्यात मासळयांचा विचार असला तर. दिवसभर नदीतील डोबा हुसकून बचकभर मासळया आणील पण मजुरी करणार नाही. ' 59

टायगर प्रोजेक्टमुळे आदिवासींचे निर्माण झालेले प्रश्न, स्वस्तदरातील लुगडी सरळ रहिमशेठच्या दुकानात जातात आणि आदिवासी स्त्रियांना ती जास्त किंमत देवून घ्यावी लागतात, मोहाची फुले गोळा करून ते विकणे हा कोरकूंचा मिळकतीचा मार्ग. परंतु व्यापारी वजनात दरात फसवून कोरकूंना नागवतात, त्यांना जीवनोपयोगी वस्तु विकताना मात्र त्यांच्याकडून भरमसाठ दर घेतात, आदिवासींना गावठी दारू व लालपरीसारख्या नशा आणणा-या वस्तु विकतात आणि त्याबद्दल कोणी तक्रारीचा सूर लावला तर त्याला सरळ कुठल्या तरी गुन्ह्यात अडकविण्यासाठी सर्व शासनयंत्रणा हे व्यापारी बरोबर राबवतात. लेखक ही सर्व वास्तवता परिणामकारक भाषाशैलीच्या निवेदनातून प्रकट करतात. मधुनमधून पात्रातील संवादांचा, अलंकारी भाषेचा, वाक्प्रचार व म्हणींचा, कोरकूंच्या लोकगीतांचा वापर करून लेखक कोरकू जीवनाचे सर्वंकष व यथार्थ चित्रण करतात.

सारांश .. भाषा हे वाङ्मयीन कलाकृतीचे माध्यम असते. या माध्यमाद्वारे लेखक आपले विचार, भावना व्यक्त करीत असतात. साहित्यकृतीत आशयाप्रमाणेच तो आशय ज्या भाषेद्वारे भाषाशैलीने, रीतीने, स्टाईलने व्यक्त केलेला असतो, त्या लेखनशैलीलाही महत्व असते. लेखनशैलीतून लेखकाचे व्यक्तित्व, स्वभाव, सौंदर्यासक्ती, अभिरूची, भोवतालच्या जीवनाबद्दल वाटणारी उत्सुकता, भावनांचे रंग, मनात स्फुरणारे कुतूहल, जीवनदृष्टी इत्यादींचे दर्शन घडते. कोणत्याही साहित्यकृतीतील जीवनाशयाची आपणास प्रचिती येते ती भाषेच्या माध्यमातूनच. म्हणूनच कोणत्याही साहित्यकृतीमध्ये आशयाइतकेच महत्व भाषाशैलीलाही असते. त्यामुळे लेखक आशयानुरूप वातावरणाशी निगडीत अशी भाषा वापरत असतो.

एकच आशय निरनिराळया पध्दतींनी सांगता येतो त्यामुळेच लेखकाने तो आशय कोणत्या पध्दतीने अभिव्यक्त - निवेदीत केला आहे यालाही महत्व असते. आशय व अभिव्यक्ती यांचा निकटचा संबंध असतो. लेखक निवेदनातून पात्रासंबंधी, वातावरणासंबंधी काही प्रकट करीत असतो. यातून लेखकाची त्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी कळते. लेखक हे निवेदन कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे तर कधी सूचकपणे करतो. निवेदनाद्वारे जीवनाविषयी लेखक भाष्य करतो. पात्रांचा, त्यांच्यातील संवादांचा, तर कधी अलंकारिक भाषेचा वापर करून लेखक परिणामकारकपणे निवेदन करण्याचा प्रयत्न करतात. आशयानुरूप निवेदनपध्दतीचा उपयोग करून लेखक जीवनावर, परिस्थितीवर भाष्य करतो. साहित्यिकाच्या, लेखकाच्या मनातला आशय त्याने निवेदीत केल्याशिवाय, अभिव्यक्त केल्याशिवाय वाचकांपर्यंत पोहोचणार नाही. म्हणूनही निवेदन महत्वाचे असते. कादंबरीमध्ये भाषा ही निवेदनात्मक संरचनेच्या रूपाने व्यक्त झालेली असते. म्हणून कादंबरीतील

जीवनाशयाच्या प्रचितीचे स्वरूप कादंबरीचे निवेदन आणि भाषा यांच्या संरचनेशी निगडीत असते. यासाठी कोणत्याही कादंबरीच्या आकलनमूल्यमापनासाठी निवेदन व भाषा यांचा विचार महत्वाचा ठरतो.

महानदीच्या तीरावर या कादंबरीमध्ये दुर्गा भागवत यांनी गोंड जीवनाचे त्यांच्या चेटूक, भूतबाधा, मंत्रतंत्र, मृतात्म्यावरील त्यांचा विश्वास व त्यामुळे दैवाधीन बनलेली त्यांची मने यांचे चित्रण करताना नागर भाषेचा संपूर्ण कादंबरीमध्ये वापर केलेला आहे. तर वाकोडे यांनी **झेलझपाट** कादंबरीमध्ये केरू व फुलय यांच्या हळुवार प्रेमकहाणीचे चित्रण करीत असताना, कोरकू जीवनाचे दर्शन घडविताना नागर भाषा व मधुनमधून पात्रानुरूप, प्रसंगानुरूप आदिवासी (कोरकू) भाषा वापरलेली आहे.

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** कादंबरीमध्ये पात्रांची भाषा नागर पध्दतीची वापरलेली आहे. पण तिच्यात आदिवासी बोलीचा कोणताही प्रभाव दिसत नसल्यामुळे ती भाषा आशयानुरूप वाटत नाही. त्यामुळे कादंबरीमध्ये स्वाभाविकता आलेली नाही. या कादंबरीतील व्यक्तीरेखा त्या वातावरणातील वाटत नाहीत. वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीमध्ये पात्रानुरूप भाषा वापरलेली आहे. आदिवासी पात्रांची भाषा प्रसंगानुरूप आदिवासी पध्दतीचीच वापरली आहे. त्यामुळे आशयानुरूप वातावरणनिर्मिती होण्यास त्याची मदत झालेली आहे. आदिवासी भाषेतील दुर्बोधता काढण्यासाठी आदिवासी भाषेतील वाक्यांशांचा अर्थही त्याच वाक्यापुढे नागर भाषेत सहजतेने दिलेला आहे. त्यामुळे त्यात कृत्रिमता वाटत नाही. वाकोडेंनी वापरलेली आदिवासीभाषा त्यामुळे समजते. स्त्रीपात्रांचे व पुरूषपात्रांचे चित्रण, वर्णन करताना लेखकाची भाषा बदलते. ती त्याच्या पात्रांना योग्य अशीच वाटते. यथार्थ भाषाशैलीमध्ये पात्रांचे, प्रसंगांचे रेखाटन वाकोडे यांनी केले आहे. त्या व्यक्तीरेखा त्या त्या वातावरणातील वाटतात. भाषेमध्ये विरोध व लय तत्वाचा वापर करून लालित्यही आणले आहे. अलंकारांचा व वाक्प्रचारांचा कादंबरीमध्ये मधुनमधून वापरही केलेला आहे.

दुर्गा भागवत यांचा **महानदीच्या तीरावर** या कादंबरीचा चित्रण विषय आदिवासी जीवन हा आहे. लेखिका कादंबरीचे निवेदन, वातावरणनिर्मिती नागर भाषेतून करतात. निवेदनामध्ये जीवनाविषयी भाष्ये करणारी वाक्येही टाकतात. आदिवासी जीवनाची पार्श्वभूमी स्वीकारून लेखिका केवळ नागर जीवनाचे चित्रण करतात असे कादंबरी वाचताना वाटते. आशयानुरूप वातावरणनिर्मिती झाली आहे असे वाटत नाही. त्यामुळे ही कादंबरी वास्तवापासून दूर जाते. **झेलझपाट** या कादंबरीमध्ये वाकोडे यांनी निवेदनाची भाषा नागर पध्दतीची वापरलेली आहे. केरू व फुलय या प्रेमीयुगुलाच्या प्रेमाचे हळुवार पदर कादंबरीतून उघडीत, निवेदीत करीत असतानाच कोरकू जीवनाविषयी यथार्थ भाषेत निवेदन केले आहे. त्यासाठी व्यक्तिचित्रणांचे वैभवही उभे केले आहे. या

कादंबरीमध्ये लेखकाने आदिवासींचे प्रश्न, त्यांची अवस्था, रूढीपरंपरा, सणसमारंभ, स्वभाव, अज्ञान, व्यसनाधीनता नागर लोकाकडून होणारी लुबाडणूक, फसवणूक, टायगर प्रोजेक्ट सारख्या सरकारी योजना, कोरकूंना धर्मांतरीत करण्यासाठी होणारे प्रयत्न, कोरकू भाषेतून कोरकूंना शिक्षण मिळण्याची गरज या सर्व गोष्टींचे अतिशय परिणामकारक, सुरेख व यथार्थ भाषाशैलीमध्ये निवेदन केले आहे. निवेदनातून लालपरीसारख्या नशा आण्णा-या वस्तु विकणाराविरूध्द तक्रार करण्यास कुठल्या तरी गुन्ह्यांत अडकविण्यासाठी सर्व शासनयंत्रणा व्यापारी लोक बरोबर राबवितात, व्यापारी वजनमापात आदिवासींना फसवितात हे सर्व वाकोडे यांनी परिणामकारक शब्दात प्रकट केले आहे. कादंबरीमध्ये पात्रांचे संवाद, अलंकारिक भाषा, वाक्प्रचार, म्हणी व कोरकूंच्या लोकगीतांचाही वापर करून कोरकू जीवनाचे सर्वंकष व यथार्थ भाषेत निवेदन केलेले आहे. या निवेदनातून लेखकाची भ्रष्टाचारविरोधी दृष्टी, सामाजिक सुधारणावादी वृत्ती तसेच समाजसमीक्षक मन ठिकठिकाणी प्रकट झालेले आहे. समाजामध्ये सशक्तांकडून दुर्बलांचे शोषण केले जाते. आदिवासींच्या दुर्बलतेचा, अज्ञानाचा फायदा घेणारे लोकही या समाजात आहेत यांचे परिणामकारक, प्रभावी भाषाशैलीमध्ये निवेदन केले आहे. आदिवासींबद्दल वाकोडे यांना वाटत असलेली तळमळ, सहानुभूती, त्यांच्यात सुधारणा झाल्या पाहिजेत म्हणून त्यांना वाटणारी काळजी इत्यादी गोष्टींचे निवेदन केले आहे. त्यातून वाकोडे यांचा मूल्यसापेक्ष जीवनविषयकदृष्टिकोनही प्रकट झाला आहे. अशात-हेने वाकोडे यांनी आपल्या सुरेख भाषाशैलीमध्ये निवेदन केलेले दिसते.

****

: संदर्भ टीपा :

1. बा. सी. मर्ढेकर, **सौंदर्य आणि साहित्य**, मौज प्रकाशन, मुंबई, (आवृत्ती तिसरी)1975, पृ. 115.
2. भालचंद्र खांडेकर व लीला गोविलकर, **अभिनव साहित्यशास्त्र**, अनमोल प्रकाशन, पुणे, 1978, पृ. 192.
3. भालचंद्र नेमाडे, **साहित्याची भाषा**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1987, पृ. 40.
4. बा. सी. मर्ढेकर, **सौंदर्य आणि साहित्य**, उ. नि. पृ. 115.
5. तत्रैव, पृ. 130.
6. भालचंद्र नेमाडे, **साहित्याची भाषा**, उ. नि. पृ. 45.
7. वा. के. लेले, **ललितलेखन व शैली**, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, 1984, पृ. 197.
8. भालचंद्र नेमाडे, **साहित्याची भाषा**, उ. नि. पृ. 48.
9. भालचंद्र नेमाडे, **टीकास्वयंवर**, . साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1990, पृ. 170.
10. बा.सी.मर्ढेकर, **सौंदर्य आणि साहित्य** , उ. नि. पृ. 117.
11. स. ग. मालशे, **साहित्य सिध्दान्त**, महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (आवृत्ती प्रथम), 1982, पृ. 190.
12. रा. भा. पाटणकर, **सौंदर्य मीमांसा**, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, (आवृत्ती दुसरी) 1981, पृ. 417.
13. भालचंद्र खांडेकर व लीला गोविलकर , **अभिनव साहित्यशास्त्र**, उ. नि. पृ. 192.
14. दुर्गा भागवत, **महानदीच्या तीरावर**, साधना प्रेस, मुंबई, (आवृत्ती प्रथम) 1953, पृ. 12.
15. तत्रैव, पृ. 16.
16. तत्रैव, पृ. 17.

BARR. DR. ... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

17. तत्रैव, पृ. 25.

18. तत्रैव, पृ. 34.

19. तत्रैव, पृ. 38.

20. तत्रैव, पृ.40.

21. मधुकर वाकोडे, **झेलझपाट**, देखमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) पुणे, (आवृत्ती दुसरी) 1992, पृ.6.

22. तत्रैव, पृ. 33.

23. तत्रैव, पृ. 40.

24. तत्रैव, पृ. 16.

25. तत्रैव, पृ. 64.

26. तत्रैव, पृ. 44.

27. तत्रैव, पृ. 31.

28. तत्रैव, पृ. 10.

29. तत्रैव, पृ. 11.

30. तत्रैव, पृ.23.

31. तत्रैव, पृ.41.

32. तत्रैव, पृ.53.

33. तत्रैव, पृ. 14.

34. तत्रैव, पृ. 17.

35. तत्रैव, पृ. 17

36. तत्रैव, पृ. 18.

37. तत्रैव, पृ. 7.

38. तत्रैव, पृ. 24.

39. तत्रैव, पृ. 49.

40. तत्रैव, पृ. 48.

41. तत्रैव, पृ. 29.

42. दुर्गा भागवत, महानदीच्या तीरावर, उ. नि. पृ. 24.

43. तत्रैव, पृ. 26.

44. तत्रैव, पृ. 28.

45. तत्रैव, पृ. 8.

46. तत्रैव, पृ. 23.

47. तत्रैव, पृ. 26.

48. तत्रैव, पृ. 10.

49. तत्रैव, पृ. 10.

50. तत्रैव, पृ. 23.

51. तत्रैव, पृ. 24.

52. तत्रैव, पृ. 39.

53. तत्रैव, पृ. 16.

54. तत्रैव, पृ. 18.

55. तत्रैव, पृ. 30.

56. मधुकर वाकोडे, झेलझपाट, उ. नि. पृ. 42.

57. तत्रैव, पृ 36.

58. तत्रैव, पृ 36.

59. तत्रैव, पृ. 94.

*****